संघर्षासाठी
# मूलनिवासी भारत
व्यवस्था परिवर्तनासाठी समर्पित मराठी साप्ताहिक...

नागपूर | वर्ष : १३ वे, अंक २७ | संपादक : वामन चिंधूजी मेश्राम | रविवार, दिनांक २५ मार्च, २०१८ | पृष्ठ : ८, मूल्य : ४ रू.

## २०१९ ची निवडणूक बॅलेट पेपरवर करा अन्यथा ईव्हीएम फोडू!

### भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांचा निवडणूक आयोगाला इशारा

**चंद्रपूर । मूलनिवासी प्रतिनिधी**

२०१९ ची लोकसभा निवडणूक ही बॅलेट पेपरवर करा अन्यथा ईव्हीएम फोडू, यासाठी जेलमध्येही जाण्यास आम्ही तयार आहोत अशा इशारा बामसेफ व भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांनी निवडणूक आयोगाला दिला. दि. १८ मार्च रोजी चंद्रपूर येथील साईमंगल कार्यालय येथे भारत मुक्ती मोर्चाद्वारे आयोजित विदर्भस्तरीय परिषदेत ते बोलत होते.

या परिषदेचे मुख्य अतिथी म्हणून मलकित सिंह बल, पंकज वंजारे, दिवाकर पेंदाम, डॉ.अभिलाषा गावतूरे, राकेश झोडे, ॲड.रहमत अली साहाब, लालसू नागोटी तसेच दिनानाथ वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

ईव्हीएम घोटाळ्यामुळे लोकतंत्र ब्राह्मणांच्या ताब्यात आहे. ईव्हीएम वापरामुळे निवडणूक फ्री अँड फेअर वाता-वरणात होत नाही. ईव्हीएमचा वापर करणे राष्ट्रद्रोह आहे. त्यामुळे २०१९ ची लोकसभा निवडणूक ही बॅलेटपेपरवर झाली पाहिजे अन्यथा आम्ही 'ईव्हीएम फोडो' अभियान राबविणार आहोत. त्यासाठी आम्हाला जेलमध्येही जावे लागले तरी जाण्यास तयार

**जेलमध्ये जाण्यास तयार**

आहोत, असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी नरेंद्र मोदींचाही खरपूस समाचार घेतला. नरेंद्र मोदी हे ब्राह्मणांनी ठेवलेला प्रधानमंत्री आहे. नरेंद्र मोदी भाषणामध्ये निव्वळ विकास, विकास, विकास असे ओरडत असतात. पण प्रत्यक्षात ओबीसींचा कोणताही विकास किंवा कल्याणाचे काम करत नाही. मोहनदास गांधी आपल्या भाषणामध्ये नेहमी हरीजन कल्याण, हरीजण कल्याण म्हणत असत. त्यांचे सोबतचे लोक गांधींना म्हणायचे, तुम्ही हरीजनांचे कोणते कल्याण करीत आहात. गांधी यावर म्हणायचे, हरीजन कल्याण म्हटल्याने लोक एवढे खुष होतात तर त्यांचे कल्याण करण्याची काय गरज आहे. त्याचप्रमाणे नरेंद्र मोदी सुद्धा विकास, विकास असे ओरडून ओबीसींना देशोधडीला लावत आहे. मोहनदास गांधी जनतेसोबत धोकेबाजी करत होते. त्याचप्रमाणे गांधीचे धोकाधडी करण्याचे चरित्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदीनी



आत्मसात केले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी ओबीसींना बजेटमध्ये फुटकी कवडी न देता ते त्यांच्या विरोधात काम करत आहेत तर मग त्यांचा विकास कसा करणार? असाही प्रश्न त्यांनी यावेळी उप-स्थित केला.

ओबीसी म्हटल्याने ओबीसींची ओळख होते. त्यांच्या हक्क-अधिकाराबद्दल बोलल्या जाते, ओबीसींच्या जनगणनेबद्दल बोलल्या जाते. परंतु ब्राह्मण ओबीसींना हिंदू म्हणून त्यांची ओळख नष्ट करत आहेत. ओबीसींना हिंदू म्हणून मुस्लिमांविरोधात उभे केले जाते. राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे भारताचे प्रथम नागरिक नसून प्रथम भगत आहेत. कारण ते देशातील सर्व मंदीरात जाऊन माथा टेकवत आहेत.

वामन मेश्राम यांनी आदिवासींच्याही समस्यांवर प्रकाशझोत टाकला. स्थलांतर आदिवासींची सामाजिक समस्या अधिक तीव्र करत आहे. सरकार आदिवासींना जल, जंगल, जमिनीपासून बेदखल करीत आहे. अमेरिकेमध्ये जर शेतकऱ्यांच्या जमिनीखाली खनीज संपत्ती आढळली तर ती शेतकऱ्यांच्या मालकीची होते. परंतु भारतातील आदिवासींच्या संपत्तवीर सरकारची नजर आहे, असेही ते म्हणाले. परिषदेच्या सुरुवातीला कार्यक्रमास आलेल्या कार्यकर्त्यांनी बहुजन चळवळतील खंदे विचारवंत प्रा.जैमिनी कडू सर यांना दोन मिनीटे मौन धारण करुन श्रद्धांजली वाहिली.

## मौलाना सज्जाद नोमानींवर दाखल केलेल्या खोट्या आरोपाविरुद्ध

### भारत मुक्ती मोर्चा व पॉपुलर फ्रंट ऑफ इंडियाचे देशव्यापी धरणा प्रदर्शन

**गुलबर्गा । मूलनिवासी वृत्तसंस्था**

ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते मौलाना सज्जाद नोमानी साहेब यांच्यावर शिया वक्फ बोर्डाचे अध्यक्ष वसीम रिजवी यांनी देशद्रोहाचा खोटा गुन्हा दाखल केला. त्यामुळे वसीम रिजवी तसेच श्री श्री रविशंकर यांच्या विरुद्ध भारत मुक्ती मोर्चा व पॉपलुर फ्रंट ऑफ इंडियाच्या वतीने २१ मार्च रोजी संपूर्ण देशभरातील ५५० जिल्ह्यात विरोध प्रदर्शन करण्यात आले.

प्रदर्शनकर्त्या लोकांचे म्हणणे आहे की वसीम रिजवी व श्री रविशंकर हे मुस्लीम तसेच मागासवर्गाला मंदीराच्या नावावर चिथावणी देण्याचे काम करत आहेत. मौलाना सज्जाद नोमारी साहेब हे भारत मुक्ती मोर्चासोबत काम करत असून मुस्लीम




समाजाला जागृत करण्याचे काम करत आहेत. ज्यामुळे मुस्लीम समाजात असलेल्या धर्मद्रोही लोकांना ही बाब सहन झाली नाही. ९० टक्के मुस्लीम समाज मशीदचे समर्थन करत असताना वसीम रिजवी हे मशीदची जागा मंदीर बांधण्यासाठी देण्याची वकालत करत आहेत. ज्याचा मुस्लीम समाज व ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते मौलाना सज्जाद नोमानी यांच्याकडून विरोध केला गेला आहे. त्यामुळे वसीम रिजवी हे दुश्मनांशी मिळाले असल्याचे पीतळ उघडे झाले. म्हणूनच वसीम रिजवी यांनी मौलाना सज्जाद नोमानी याच्यावर देशद्रोहाचा खोटा गुन्हा दाखल केला असल्याचे प्रदर्शनकर्त्या लोकांनी सांगितले.

प्रदर्शनकर्त्या लोकांचे असेही म्हणणे आहे की मौलाना सज्जाद नोमारी हे मुस्लीम व बहुजन समाजाला एकत्र आणत त्यांना जागृत करण्याचे काम करत आहेत तर वसीम रिजवी व रविशंकर हे मुस्लीम व बहुजन समाजाला चिथावणी देऊन भडकविण्याचे काम करत आहे. त्यामुळे वसीम रिजवी व रविशंकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारत मुक्ती मोर्चा व पॉपूलर फ्रंट ऑफ इंडियाच्या वतीने संपूर्ण देशभरात केली जात आहे.



# चवदार तळे समता संगर हा पाण्यासाठी नव्हे तर मानवी मूल्ये प्रस्थापित करण्यासाठी

दिलीप बाईत
मो.९२७०९६२६९८

२० मार्च १९२७ रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड या ऐतिहासिक ठिकाणी चवदार तळे सत्याग्रह केला. हा समता संगर पाण्यासाठी नव्हता तर मानवी मूल्ये प्रस्थापित करण्यासाठी होता. या सत्याग्रहामागची पहिल्यांदा पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. रावसाहेब सी.के.बोले यांनी मुंबई कौन्सिलमध्ये सर्व सार्वजनिक ठिकाणे सर्व लोकांसाठी खुली असावीत असा प्रस्ताव मंजूर करुन घेतला. परंतु केवळ कायदा बनवून उपयोग नाही तर त्याची अंमलबजावणी व्हायला हवी. ती अंमलबजावणी करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्याची निवड केली. पाणी पिण्यासाठी हे आंदोलन नव्हते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मुंबईत पाणी मिळत नव्हते? मुंबईच्या पाण्यापेक्षा महाडच्या तळ्यातील पाणी काय अधिक शूद्ध होते? गांधीने मिठाचा सत्याग्रह केला. मग गांधीला खायला मिठ मिळत नव्हते काय? तर मग डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हा संघर्ष का केला? ‘सर्व माणसे समान आहेत, त्यामुळे सार्वजनिक ठिकाणे सर्वांसाठी मुक्त खुली असली पाहिजेत’ या मानवी मूल्यांसाठी हा संघर्ष करण्यात आला. ‘समता संगर’ हा लेख बहिष्कृत भारतमध्ये लिहून बाबासाहेबांनी हा संघर्ष करण्याचे मूलभूत कारण सांगितले आहे. हा संगर मानवमुक्तीचा होता. जे गुलाम होते त्यांच्या स्वातंत्र्याचे आंदोलन होते. संघर्ष करणाऱ्या, आंदोलन करणाऱ्या लोकांसाठी दोन महत्त्वपूर्ण बाबी सांगितल्या होत्या. दोन मौलिक संदेश दिले होते. ते दोन्ही मौलिक संदेश आज आंदोलन करणाऱ्यांनी, संघर्ष करणाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. १) जागृतीचा विस्तव तुम्ही कधीच विझू देता कामा नये २) विचारात परिवर्तन केल्याशिवाय आचरणात परिवर्तन होत नसते. जे लोक समझोते करतात, सौदेबाजी करतात, तडजोडी करतात त्यांच्यासाठी या संदेशाचे काहीच मूल्य नाही. त्यांच्यासाठी हे दोन्ही संदेश शून्य आहेत. हा विचार, हा संदेश त्या लोकांसाठी मौल्यवान आहे जे लोक आज वर्तमान काळात स्वातंत्र्याचे आंदोलन चालवू इच्छितात, जे लोक आज वर्तमान काळात स्वातंत्र्यासाठी संघर्ष करु इच्छितात, जे लोक आज वर्तमान काळात इज्जतीसाठी, मान-सन्मानासाठी झगडतात त्यांच्यासाठी हा मौल्यवान संदेश आहे.

२० मार्च १९२७ ला हे आंदोलन सुरु करण्यात आले. तेव्हापासून आपला जो निर्धारित शत्रू आहे त्याने खूप पाणी ओतले व जागृतीचा अग्नी विझविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्या जागृतीच्या अग्नीला पुनश्च प्रज्वलीत करावे लागेल. पुन्हा पेटवावा लागेल. महाराष्ट्रातील लोक वरील दोन्ही महत्त्वपूर्ण संदेश विसरुन गेले



आहेत. जे लोक इतिहास विसरतात इतिहास देखील त्यांना विसरतो. इतिहास देखील अशा लोकांना आठवणीत ठेवत नाहीत. यावर गंभीरपणे विचार करुन इतिहासाला विसरता कामा नये जे लोक आज इतिहास विसरले आहेत त्यांना इतिहासाचे स्मरण करुन द्यावे लागेल, आठवण करुन द्यावा लागेल. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या उद्देशासाठी महाडचा संग्राम केला हे लक्षात घेऊन वर्तमानकाळातील संघर्ष केला पाहिजे. बाबासाहेब त्यादिवशी आपल्या भाषणात म्हणाले होते, ‘आजचा दिवस हा एक फ्रेंच राज्यक्रांतीपेक्षाही महान आहे.’ न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव यावर आधारित नवा समाज, नवा देश, नवा भारत, नवे राष्ट्र निर्माण करणे हा बाबासाहेबांचा उद्देश होता. तो त्यांनी बोलून दाखवला. महाडच्या क्रांतीदिनाची तूलना फ्रेंच राज्यक्रांतीशी केली. बाबासाहेबांनी दिलेला उद्देश आजही अपूर्ण आहे. आपले लोक दर्शनासाठी येतात, दर्शन घेतात व कृतकृत्य होऊन माघारी जातात. दर्शन घेतले म्हणजे आपले कर्तव्य संपले. जयंती केली म्हणजे आपले कर्तव्य संपले असे समजतात. अपूर्ण संघर्ष पूर्ण करण्यासाठी कार्य करीत नाहीत. आपल्या मूलनिवासी बहुजन समाजातील लोकांना विस्मरणाचा म्हणजे विसरण्याचा फार मोठा आजार आहे. आपला शत्रू आपल्याला दररोज जोडे मारतो, तो आपल्यावर दररोज अन्याय, अत्याचार करतो, स्वतःला महान पराक्रमी समजतो. आपण तर त्यांच्यापेक्षाही महान आहोत. कारण आपण दररोज त्यांचे जोडे खातो व दररोज विसरुन जातो.

शत्रूला ओळखा, शत्रूला समजून घ्या. जो शत्रूला ओळखत नाही, जाणत नाही तो जागृत असू शकत नाही. जो शत्रूला ओळ-खतो व जाणतो तोच खरा जागृत. ९१ वर्षानंतरही आपल्याला शत्रूची माहिती नाही, ओळख नाही. म्हणून जागृतीची आवश्यकता आहे. १९२७ चा संदेश जागृतीचा अग्नी अखंड तेवत ठेवा. हा संदेश आज देखील प्रासंगिक आहे. आज सर्व मूलनिवासी बहुजनांना जागृतीची गरज आहे. त्यासाठी आंदोलनाची पुनर्निमिती करावी लागेल. म्हणून ‘जागृतीचा अग्नी अखंड तेवत ठेवा’ हाच जागृतीचा पहिला धडा आहे. आपला शत्रू केवळ युरेशियन ब्राह्मण आहे, दुसरा केणीही नाही.

आपल्याला आपल्या मित्राची ओळख असली पाहिजे. आपला मित्र कोण, शत्रू कोण याची माहिती असली पाहिजे. जे लोक उद्दिष्ट निर्धारित करुन काम करतात ते केवळ एकाच जातीच्या लोकांना एकत्र करुन काम करीत नसतात. ६ हजार जातीचे लोक या युरेशियन ब्राह्मणांच्या व्यवस्थेचे बळी आहेत, शिकार आहेत. ते सर्व पीडित, शोषित आहेत. त्यासाठी ६ हजार जातींच्या लोकांचे संघटन बनवावे लागेल. मोर्चा बनवावा लागेल. भारताच्या मुक्तीसाठी मोर्चा. भारत देशाच्या इतिह-ासात युरेशियन ब्राह्मण कधीही या देशाचा राजा नव्हता. परंतु १५ ऑगस्ट १९४७ नंतर मात्र तो भारताचा राजा झाला. त्याने भारताच्या संपूर्ण सत्तेवर कब्जा केला, नियंत्रण मिळविले. आपली गुलामी दृढ झाली. आपली गुलामी अधिक दृढ करण्यासाठी युरेशियन ब्राह्मणांनी वेगवेगळी षड्यंत्रे आखली. त्यामध्ये एलपीजी, सेझ, उच्चशिक्षणाचे खाजगीकरण, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा बट्ट्याबोळ केला.

प्राचीन काळात बुद्ध ज्यांना बहुजन म्हणून संबोधायचे, मध्ययुगीन काळात संत ज्यांना वारकरी म्हणून संबोधायचे, मध्ययुगीन काळात छत्रपती शिवाजी महाराज ज्यांना मावळे म्हणायचे, आधुनिक काळात राष्ट्रपिता जोतिराव फुले ज्यांना सत्यशोधक म्हणायचे, आधुनिक काळात राजषी छत्रपती शाहू महाराजांनी यांनाच ५० टक्के आरक्षण दिले. आधुनिक काळात विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांनाच संविधानिक नावाने संबोधतात. एससी, एसटी, ओबीसी, एनटी, डीएनटी, व्हीजेएनटी, धर्मपरिवर्तीत असे त्यांनी संबोधित केले. एससीला जागे करण्यासाठी दोन आंदोलने केली. चवदार तळ्याचे महाड येथील आंदोलन, नाशिक काळाराम मंदीर येथील आंदोलन. एसटी म्हणजे आदिवासींना जागे करुन जोडण्यासाठी ३४२ कलमानुसार संविधानात व्यवस्था केली. ओबीसीला जागे करुन जोडण्यासाठी ३४० व्या कलमानुसार त्यांची व्यवस्था केली. एक्स क्रिमिनल ट्राईब्स गुन्हेगार जातींसाठी ४६ व्या कलमानुसार व्यवस्था केली. धर्मांतरित लोकांसाठी २५ ते २९ कलमानुसार व्यवस्था केली. महिलांना गुलामीतून मुक्त करण्यासाठी हिंदू कोड बील आणले. युरेशियन ब्राह्मणांनी जात बनविली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रवर्ग बनवले व बामसेफने एकच मूलनिवासी बहुजन समाज संकल्पना रुजविली.

इंग्रजांच्या काळात युरेशियन ब्राह्मण ओबीसींना शूद्र म्हणत व मानत होते. आता तेच युरेशियन ब्राह्मण ओबीसींना हिंदू म्हणतात. त्यांनी ओबीसींना शूद्र म्हणायचे बंद केले. ज्यावेळी युरेशियन ब्राह्मण ओबीसींना शूद्र म्हणायचे तेव्हा ओबीसींना ती शिवी वाटायची म्हणून ओबीसी प्रतिक्रिया द्यायचे. राष्ट्रपिता जोतिराव फुले व राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे आंदोलन ही एक प्रतिक्रियाच आहे. राष्ट्रपिता जोतिराव फुलेंना शूद्र म्हणताच त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना करुन प्रतिक्रिया दिली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना शूद्र म्हण-ताच त्यांनी २६ जुलै १९०२ रोजी शूद्र-अतिशूद्रांना ५० टक्के आरक्षण दिले. राष्ट्रसंत गाडगेबाबांनीही पंढरपूरच्या सभेत खरपूस समाचार घेत प्रतिक्रिया दिली. शूद्र म्हटल्यामुळे ओबीसी प्रतिक्रिया देऊ लागले. त्यामुळे युरेशियन ब्राह्मण सावध झाले. त्यांनी रणनितीत बदल करुन डावपेच बदलला आणि ओबीसींना हिंदू म्हणू लागले. जसा युरेशियन ब्राह्मण ओबीसींना हिंदू म्हणू लागले त्याचक्षणी ओबीसींनी प्रतिक्रिया देणे बंद केले.

केवळ एससी, एसटींना एकत्र करुन आपण ही लढाई लढू शकत नाहीत. युरेशियन ब्राह्मणांनी आपल्या लोकांना ६ हजार जातीच्या तुकड्यात विभाजीत केले. त्यामुळे आपण प्रतिकारहीन झालो आहोत. परिणामी ते आपल्यावर गुलामी लादण्यात यशस्वी झाले आहेत. म्हणून आपल्याला एकत्र यावे लागेल. शत्रूकडे सर्वसाधने आहेत, परंतु लोक नाहीत. तर तो विदेशी व अल्पसंख्य आहे. शत्रूची शक्ती व शत्रूची कमजोरी याची जाणीव असली पाहिजे. हा जागृतीचा तिसरा धडा आहे. आपण बहुसंख्य व मूलनिवासी आहोत ही शक्ती आहे मात्र आपल्याजवळ साधनांचा अभाव आहे. ही आपली कमजोरी आहे. हा जागृतीचा चौथा धडा आहे तर आपल्याला इतिहास माहीत असला पाहिजे. इतिहास माहीत असेल तरच इतिहास निर्माण करता येतो. हा जागृतीचा पाचवा धडा आहे. त्यामुळे आपल्याला यशस्वी व्हायचे असेल तर मूलनिवासी बहुजनांनी हातात हात घालून शत्रूशी दोन हात करावे लागतील. तरच गुलामीतून मुक्त होणे कठीण नाही.



# आरोपी व सरकारी वकिलांचे आरएसएसशी लागेबांधे

## व्यापम घोटाळ्याची हवाच काढली, सर्वांना वाचविण्याचा मध्य प्रदेश सरकारचा प्रयत्न

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**




मध्य प्रदेशमध्ये झालेल्या व्यापम घोटाळ्याची केंद्र सरकारने हवाच काढली असून याप्रकरणी तपास करणारे ७० टक्के अधिकारी कमी करण्यात आले आहेत. दरम्यान सर्वोच्च न्यायालयात व्यामप घोटाळ्याची बाजू मांडणाऱ्या सरकारी वकिलांचे व आरोपींचे आरएसएसच्या मोठ्या लोकांशी लागेबांधे आहेत. परिणामी या घोटाळ्याच्या निष्कर्षापर्यंत सीबीआय अजूनही पोहोचलेली नाही. एकंदरीत सीबीआयने डोंगर पोखरुन उंदीर काढल्याचे प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

२०१२ मध्ये व्यापम घोटाळा उघडकीस आला. या घोटाळ्यात रहस्यमयरित्या ४८ जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी अडीच हजार लोकांवर आरोप ठेवण्यात आले होते. त्यातील २ हजार लोकांना पकडण्यात आले. या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपविण्यात आली होती. दरम्यान या प्रकरणातील चौकशी करणाऱ्या २० अधिकाऱ्यांची बदली सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेत करण्यात आले आहे. जवळजवळ ७० टक्के अधिकारी कमी करण्यात आले. नेहमीप्रमाणे व नियमानुसार बदली केल्याचा दावा सीबीआय करत असले तरी मध्य प्रदेश सरकारला वाचविण्यासाठी अशा प्रकारचा प्रयत्न केल्याचे दिसत आहेत.

या प्रकरणी माजी आमदार डॉ.पारस सकलेचा यांनी सीबीआयच्या या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तर आशिष चतुर्वेदी यांनीही या प्रकरणाची चौकशी लांबणीवर पडावी म्हणून अशा प्रकारच्या क्लृप्त्या केल्या जात आहेत. उच्च न्यायालयाने भोपाळ, इंदोर, ग्वालियर, जबलपूर या ठिकाणी अतिरिक्त १७ न्यायाधिशांची नियुक्ती केली आहे. हा विरोधाभास असल्याचे चतुर्वेदी याचे म्हणणे आहे. व्यापम घोटाळ्याविरोधात आवाज उठविणारे डॉ.आनंद राय म्हणाले, ७० टक्के अधिकाऱ्यांची बदली करणे ही रणनीती चुकीची आहे. ही रणनीती घातक ठरु शकते. आपल्या म्हणण्याप्रमाणे जे अधिकारी वागणार नाहीत त्यांना हटविण्यात आले आहे. जेणेकरुन त्या प्रकरणातून आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न आहे. तपास करणाऱ्या एका सीबीआयच्या अधिक्षकाला हटविण्यात आले आहे.

२००६-२०१७ पर्यंत व्यापम घोटाळा होत होता. एटीएसमार्फत चौकशीलाही फाटा देण्यात आला. या संदर्भात सीबीआय चौकशीची मागणी करण्यात आली. परंतु सीबीआयची कामगिरीही निराशाजनक आहे. गेल्या ३ वर्षापासून त्याची चौकशी सुरु असून अद्यापही कोणत्याही निष्कर्षापर्यंत सीबीआय पोहचू शकली नाही. त्यामुळे आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न यातून दिसत आहे.

### आरोपींमध्ये मोठे मासे

व्यापम घोटाळ्यातील आरोपींचा आरएसएसशी संबंध आहे. त्यामुळेच त्यांना वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला जात आहे. आरएसएसचे तत्कालीन प्रमुख के.सुदर्शन यांचे स्वीयसहाय्यक मिहिर चौधरी, व्यामपचे नियंत्रक आणि संचालक सुधीर भदौरिया, त्यांची मुलगी मेघना भदौरिया यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. सुधीर भदौरिया व मेघना यांचा भाजप नेते राम माधव यांच्याशी निकटचा संबंध आहे. माजी मुख्यमंत्री उमा भारती यांचेही नाव एक्सलसिटमध्ये होते. राज्यपाल रामनरेश यादव यांचेही नाव होते. त्यामुळे या बड्या माशांना हात लावायचा कसा? असा प्रश्न शिवराज सिंह सरकारसमोर उभा राहिला आहे. परिणामी अधिकारी कमी करुन चौकशी भरकटवली जात आहे.

# मोदींच्या नियंत्रणातील नोकरी बोर्डात घोटाळा

## संसदीय समितीच्या अहवालातून उघड, 'ना खाऊंगा ना, खाने दुंगा' वल्गना हवेत विरल्या

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

### विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात



प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी २०१४ ची लोकसभा निवडणूक भ्रष्टाचाराला मुद्दा बनवून लढविली आणि सत्ता प्राप्त केली. मात्र आता भ्रष्टाचार सहन केला जाणार नाही अशी वल्गना करणाऱ्या मोदींच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या नोकरी बोर्डात भ्रष्टाचार झाल्याचे संसदीय स्थायी समितीच्या अहवालातून उघडकीस आले आहे. त्यामुळे 'ना खाऊंगा ना, खाने दुंगा' ची घोषणा हवेत विरली असल्याचे दिसून येत आहे.

भाजप सरकारचा घटत असलेला विश्वास आणि प्रतिमा सावरण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत असताना संसदेच्या स्थायी समितीने नवीन घोटाळा उघडकीस आणून भाजपसमोर एक नवीन पेच निर्माण केला आहे. मध्य प्रदेशात झालेल्या व्यापम घोटाळ्यानंतर शिक्षण क्षेत्रातील नोकऱ्यांच्या निवडीबाबत हा दुसरा मोठा घोटाळा असल्याचे बोलले जात आहे.

केंद्र सरकारच्या नोकऱ्यांसाठी इच्छुकांची निवड करणारे सेवा निवड मंडळ या घोटाळ्याचे केंद्र बनले आहे, असे संसदेच्या स्थायी समितीच्या १४ मार्च रोजीच्या अहवालात म्हटले आहे. विशेष बाब म्हणजे हा विभाग थेट प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नियंत्रणात आहे.

नुकत्याच झालेल्या परीक्षांच्या माध्यमातून ५० हजार नियुक्त्या केल्या जाणार होत्या. परंतु सर्व्हिस सिलेक्शन बोर्डात सुरु असलेल्या गडबडीनंतर प्रश्नचिन्हे निर्माण होत आहे. त्याचे कारण म्हणजे एका पाठोपाठ एक तयार केली जाणारी प्रश्नपत्रिका परीक्षा घेण्याच्या आधीच बाहेर पडली. ही बाब स्वत: सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाने संसदीय समितीपुढे कबूल केली आहे. डिसेंबर २०१६ पर्यंत आठ प्रश्नपत्रिका व त्यानंतर दोन प्रश्नपत्रिका फुटल्या. मात्र या प्रश्नपत्रिका कोणी फोडल्या व कशा बाहेर आल्या याबाबत खुलासा केला जात नाही. संसदीय समितीने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विरोधी पक्षाने हा मुद्दा उपस्थित करत प्रधानमंत्री कार्यालयातील राज्यमंत्री व सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाचे अध्यक्ष असिम खुराना यांना ताबडतोब पदावरुन दूर करण्याची मागणी केली. ५० हजार जोगसाठी २ कोटी विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते.

काँग्रेसचे प्रवक्ते रणदिप सुरजेवाला यांनी पेपरफुटी कशी होते हे तपशीलावर सांगितले. त्यांचा दावा आहे की, एसएसबीने परीक्षा आयोजित करण्याआधी ऑनलाईन परीक्षेसाठी खाजगी संस्थांसाठी निविदा काढली होती. त्यात अशी अट घातल्या गेली होती की परीक्षा घेण्यासाठी प्रश्नपत्रिका दोन तास आधी उपलब्ध करु दिल्या जाणार होत्या. ज्या कंपन्यांना परीक्षेचे कंत्राट दिलेत त्याच कंपन्यांच्या संगणकावरुन प्रश्नपत्रिका अपलोड केल्या जात होत्या. हे काम चेन्नईत केले जात होते. या कंपन्यांनी वेळेआधीच प्रश्नपत्रिका बाहेर आणली. यातून मोठी कमाई केली जाऊ शकते. या उद्देशातून कंपन्यांनी ती रिमोट ॲक्सेस सॉफ्टवेअरच्या मदतीने ती फोडली.

# सरकारकडे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारीच नाही

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

२०१६ मध्ये ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली त्या शेतकऱ्यांची सरकारकडे आकडेवारीच नाही, अशी कबुली कृषी राज्यमंत्री पुरुषोत्तम रुपाला यांनी दिली. राज्यसभेत विचारलेल्या प्रश्नावर ते बोलत होते. २०१५ पर्यंत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची आकडेवारी वेबसाईटवर उपलब्ध आहे. दरम्यान गृहमंत्रालयाच्या अखत्यारित असणाऱ्या एनसीआरबीने आकडेवारी देणे गरजेचे होते. परंतु ही आकडेवारी देण्यात आलेली नाही.



२०१५ मध्ये ८ हजार ७ शेतकऱ्यांनी तर ४ हजार ५९५ मजुरांनी आत्महत्या केली आहे. हा आकडा त्यावर्षी झालेल्या १ लाख ३३ हजार ६२३ आत्महत्यांमध्ये ९.४ टक्के आहे. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात ४ हजार २९१, कर्नाटक १ हजार ५६९, तेलंगणा १ हजार ४००, मध्य प्रदेश १ हजार २९०, छत्तीसगढ ९५४, आंध्र प्रदेश ९१६, तामिळनाडू ६०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या सात राज्यातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची एकूण संख्या ११ हजार २६ आहे. तर त्याचवर्षी १२ हजार ६०२ शेतकऱ्यांनी देशभरात आत्महत्या केली आहे. त्याची टक्केवारी ८७.५ टक्के आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न व त्यांची सामाजिक सुरक्षा कशी वाढेल या दृष्टीने केंद्र सरकारच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. असे असूनही २०१३ पासून प्रत्येक वर्षी १२ हजारपेक्षा जास्त शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्यामुळे केंद्र सरकार कितीही गमजा मारत असले तरी आत्महत्या रोखण्यास सरकारला यश आलेले नाही.



# आदरणीय न्यायाधिशांनी अॅट्रॉसिटी अॅक्ट कठोर करण्याची गरज

ज्योती किरतकुडवे
मो.९९३००२७९२३

''अत्याचार'' हा ज्यांच्यावर होतो त्यांनाच ठाऊस असणार काय असतो? ज्यांच्यावर अत्याचार होत नाही त्यांना अत्याचाराची जाणीवच नसते. म्हणून ''अत्याचार'' हा शब्द फक्त उच्चारणे व ज्यांच्यावर वर्षानुवर्षे प्रत्यक्षपणे होतो आहे, यात खूप तफावत असते. लोकशाहीचे राज्य असताना देखील 'अत्याचार' हा अनुसूचित जाती/जमातीतील लोकांवर होतच आहे. हा अत्याचार कशासाठी होतो? आणि का होतो अत्याचार? कारण, भारत देश कितीही विज्ञानाच्या दृष्टीने पुढे गेला तरी या देशातील जातीय व्यवस्था अजूनही संपलेली नाही. ती वाढतच चालली आहे.

वर्षानुवर्षे माणुसकीलाही लाजवेल एवढा अत्याचार वर्णभेद, जाती, धर्म, लिंग, वंश या सर्व गोष्टींमुळे अनुसूचित जाती/जमातीतील लोकांवर केला जात आहे आणि या अत्याचाराविरोधात आवाज जरी उठवला तरी न्याय मिळत नाही, हे २१ व्या शतकात तरी योग्य नाही. अन्याय/अत्याचार विरोधात आवाज उठवण्यासाठीही भारतीयांना 'अत्याचार' कोणावर झाला? हे अजूनही या देशात जातींच्या स्वरुपावर ठरविले जाते. ही भारतीयांसाठी निंदणीय बाब आहे.

भारत देशात वर्षानुवर्षे चालत असलेल्या अनिष्ठ रुढी-परंपरा, हिंदू धर्माच्या चालीरिती, हिंदू धर्माने उगाचच लादलेला वर्णवाद अजूनही संपुष्टात आला नाही. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २६ जानेवारी १९५० रोजी भारताला संविधान देऊन भारतातील सर्वच नागरिकांना समानता, स्वातंत्र्य, बंधुत्व बहाल केले आहे. पण अत्याचार करणारी मनुवादी मानसिकतेची माणसे, माणूस असूनही माणूस म्हणून जगण्याच्या लायकीचेही नाहीत आणि ज्या मनुवाद्यांना ते कळत नाही अशा मनुवाद्यांना कायद्याने शिक्षा करणे हे सरकारचे काम आहे. कारण या देशात जो कोणी वर्णभेद, जाती, धर्म, वंश, भेद या गोष्टींना महत्त्व देऊन एखाद्यावर अन्याय/अत्याचार करतो, अशा लोकांना भारतीय संविधानातील कायद्यानुसार शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी सर्वच बहुजनांची आहे. स्वतः माणूस असून खालच्या जातीतील असल्याचे हिणवून एखाद्या माणसाचा छळ करणे यावरच मनुवादी मानसिकता असलेली माणसे खरच माणूस म्हणवण्याच्या तरी लायकीचे आहेत काय?

अनुसूचित जाती/जमातीतील लोकांवर कायमच होणारा अन्याय/अत्याचार अॅट्रॉसिटी कायद्याने थोड्या प्रमाणात का होईना दूर झाला आहे. थोड्या प्रमाणात यासाठी कारण कायदा योग्यच आहे, परंतु कायद्याची अंमलबजावणी करणारे योग्य नाहीत. मागे अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जाती/जमातीतील लोकांवर झा-लेला अत्याचार अजूनही अंगावर शहारे आणतो. तोच भोतमांगे कुटुंबावर मनुवाद्यांनी जातीय वादातून केलेला अत्याचार डोळ्यांत पाणी आणल्याशिवाय राहत नाही.

या २१ वे शतक विज्ञानाचे युग असून मनुवादी मानसिकतेचा माणूस जातीयतेच्या वादातून कित्येक अनुसूचित जाती/जमातीतील माणसांचा, स्त्रियांचा, तरुणांचा, तरुणींचा काहीही दोष नसताना फक्त जातीच्या नावावरुन हत्या करणार? आणि कित्येक दिवस या समाजाने अशा हीनवृत्तीची मानसिकता ठेवणाऱ्या व स्वतः ला उच्च म्हणवणाऱ्या अशा निर्दयी लोकांचा अन्याय सहन करायचा?

सुप्रीम कोर्टाच्या अॅट्रॉसिटी अॅक्टच्या कायद्याच्या बदलत्या निर्णयाचा अनुसूचित जाती/जमातीतील महिलांनी आदर करावा की अनादर? कायदा आमच्या बापाने लिहिला हे जरी आम्ही घसा फाडून ओरडत असलो तरी आता त्या कायद्याची अंमलबजावणी करणारे योग्य नाहीत असे, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने स्पष्ट झाले आहे. या बाबतीत सुप्रीम कोर्टाने अनुसूचित जाती/जमातीतील महिलांवर होणाऱ्या




अत्याचारासाठी काय निर्णय दिला आहे. म्हणजे एखादा जातीयवादी अन्याय/अत्याचार करुन जाणार तिथे त्याने गुन्हा केला आहे की नाही ही चौकशी राहिली बाजूला पण त्याला अटकपूर्व जामीन मात्र दिला जाणार! हा कायद्याने दिलेला न्याय की अन्याय? आणि हा निर्णय जातीयता वढविण्यासाठी की, जातीयता मिटविण्यासाठी?

आजपर्यंत अॅट्रॉसिटी अॅक्टच्या नोंदविलेल्या गुन्ह्यात किती जणांना कायद्याने योग्य शिक्षा दिली आहे. अत्याचार करुन गुन्हेगार आयुष्यभर मोकाट फिरतात तरीही त्यांना फासावर चढविले जात नाही आणि गुन्हेगारांना फासावर चढविण्याची वेळ येते तेव्हा ते संपूर्ण आयुष्य जगून मरतात सुद्धा! पण न्याय मिळत नाही. आता तर न्यायालयाने फर्मान काढून जातीयवादी लोकांना अत्याचार करण्याची संधी दिली आहे. अॅट्रॉसिटी अॅक्ट गुन्ह्यांसंदर्भात किती ठिकाणी न्यायालयाने फास्ट ट्रॅक कोर्ट सुरु केले आहेत? जिथे न्यायालय लोकांच्या संरक्षणासाठी बनविले गेले आहे तिथे जर आमच्यावरती अत्याचार करणाऱ्या गुन्हेग-ाराला न्याय देणारे न्यायालय अटकपूर्व जामीन देऊन मोकाट सोडत असेल तर आम्ही न्याय कोणाकडे मागायचा? की, या देशात आजपर्यंत सर्वच क्षेत्रात उपेक्षित ठेवलेल्या समाजाला न्यायही मागायचा अधिकार नाही आणि सुप्रिम कोर्ट मनुवादी विचारसरणी संपविण्यासाठी कधी कायदा बनविणार? मनुवादी विचारसरणी संपविण्यासाठी हा अॅट्रॉसिटी अॅक्ट कठोर का नाही केला गेला?

आदरणीय न्यायाधिशांनी जो निर्णय दिला तो अमान्य आहे असे मी म्हणणार नाही, पण हा निर्णय अनुसूचित जाती/जमातीतील लोकांनी मान्य करावा असाही नाही. कारण ज्या देशाचा कायदाच आमच्या बापाने लिहिला त्या कायद्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे आणि ते संविधानामुळेच मिळाले आहे. पण जी कोणी भारतीय नागरिक असलेली व्यक्ती अभिव्यक्ती स्वातंत्र्यांचा उपयोग वर्षानुवर्षे अन्याय/अत्याचाराने पीडित असलेल्या अनुसूचित जाती/जमातीतील माणसांचा (अॅट्रॉसिटी कायदा) सुरक्षा कायदा रद्द करण्याबाबत करत असेल तर ते कितपत योग्य आहे? मुळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे अनुसूचित जाती/जमातीतील लोकांसहित सर्वच भारतातील लोकांना स्वातंत्र्य मिळाले आहे, मग काही मनुवादी विचारसरणीच्या लोकांना अनुसूचित जाती/जमातीतील लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा काय अधिकार? काय त्यांना पुन्हा वर्णभेद प्रस्थापित करायचा आहे का?

अॅट्रॉसिटी कायदा अजून कठोर करुन गुन्हेगारांना शक्यतो लवकरात लवकर शिक्षा मिळणे गरजेचे आहे. या कायद्याची जरब जोपर्यंत अत्याचार करणाऱ्या लोकांना बसत नाही तोपर्यंत स्वतः उच्च म्हणवून घेणारे समाजातील काही मनुवादी मानसिकता असलेले लोक सुधारणार नाहीत. अत्याचार कोणत्याही समाजावर होत असेल तर अत्याचार करणाऱ्याला शासन हे झाले पाहिजे. भारत देश हा संविधानाच्या कायद्यानुसार चालतो व चालत राहणार हे अॅट्रॉसिटी अॅक्ट बदलण्याची भाषा करणाऱ्यांनी लक्षात ठेवावे. निदान जे स्वतः ला जनतेचे नेते म्हणवतात त्यांनी जनतेच्या हिताचे वक्तव्य करावे अन्यथा अशा नेत्यांना कुठलाच समाज स्वीकारत नाही, हे अनुसूचित जाती/जमातीच्या विरोधात वक्तव्य करणाऱ्या सर्वच नेत्यांनी ध्यानात ठेवावे. अनुसूचित जाती/जमातीतील लोकांचा मार्ग हा शांतीचा आहे पण वेळ आल्यावर क्रांतीचाही होऊ शकतो.

# भारतातील आई-वडिलांना मुली नकोशाच

## राष्ट्रीय आरोग्य अहवालातील धक्कादायक माहिती

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

'लेक वाचवा, लेक शिकवा' अशी शासनाकडून हाक देणाऱ्या भारत देशातील नागरिकांना मुली नकोशाच झाल्या असल्याचे दिसून येत आहे. भारतात प्रधानमंत्र्यांपासून तर राष्ट्रपतींपर्यंतची पदे महिलांनी भूषवली आहेत. सर्वच क्षेत्रांमध्ये महिला उत्तम कामगिरी करत आहेत. अंतराळ, अर्थ, बँकींग, शेअर बाजार आणि विविध उद्यो-गातील वरिष्ठ पदेही महिलांनी पादाक्रांत केली आहे. ही बाब भारतासाठी गर्वाची असली तरी भारतात मुलींचा जन्मदर वाढला असे दिसून येत नाही.

संपन्न व साक्षर राज्यांमध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण कमी झालेले आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात मुलींचा जन्मदर कमी आहे. ग्रामीण भागात ९२३ मुलींच्या तुलनेत शहरांमध्ये हे प्रमाण ९०२ इतके नमूद करण्यात आले आहे. कमी जन्मदराचा परिणाम देशाच्या लोकसंख्येवर होतो. यात स्त्री पुरुष जन्मदरातील अंतर वाढलेले दिसते. १९५१ मध्ये १ हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण हे ९४६ होते. या तुलनेत २०३१ मध्ये हे प्रमाण ९३६ असेल, असे जागतिक बँकेने भाकीत केलेले आहे. मुलांची संख्या मर्यादित ठेवणाऱ्या कुटुंबातील महिलांवर मुलाच्या जन्मासाठी दडपण वाढते, असे अनेक अहवालातून समोर आलेले आहे.



देशात विशेष म्हणजे उत्तर व पश्चिम विभाग, तसेच मागास राज्यांपेक्षा संपन्न राज्यांमध्ये मुलींचा जन्मदर कमी असल्याचे आढळून आले आहे. राष्ट्रीय आरोग्यासंदर्भातील नव्या अहवालातील माहितीमधून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. सॅंपल रजिस्ट्रेशन सिस्टिमच्या २०१३-१५ या वर्षातील माहितीनुसार देशात मुलींचा जन्मदर १ हजार मुलांमागे ९०० असा आहे.

### १ हजार मुलांमागे असलेले मुलींचे प्रमाण

| | |
|---|---|
| हरियाणा | -८३१ |
| गुजरात | -८५४ |
| दिल्ली | -८६९ |
| उत्तर प्रदेश | -८७९ |
| जम्मू काश्मीर | -८९९ |
| उत्तराखंड | -८४४ |
| राजस्थान | -८६१ |
| महाराष्ट्र | -८७८ |
| पंजाब | -८८९ |
| संपूर्ण भारत | -९०० |





## संपादकीय

# अण्णांची 'टोपी'

राळेगण सिद्धीचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पुन्हा एकदा दिल्लीतील रामलीला मैदानावर जनलोकपालसाठी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. मरण आले तरी बेहत्तर अशात-हेची डरकाळी त्यांनी फोडली असली तरी या डरकाळीला गांधीवादाचा गंध येत आहे. कारण मोहनदास करमचंद गांधी यांनी सर्व बहुजन समाजाला जी 'टोपी' घातली त्याचीच 'री' अण्णा हजारे ओढत आहे. गांधी टोपी म्हणजे बदमाशी आणि गांधीवाद म्हणजे बदमाशांचा अड्डा.

२०११ मध्ये काँग्रेसच्या सत्ताकाळात जनलोकपाल विधेयक मंजूर झाले. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यानंतरच्या २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेवर येऊनही या जनलोकपालकडे ढुंकूनही पाहिले नाही. त्यामुळे अण्णा हजारेंचा तिळपापड झाला आहे. म्हणून पुन्हा एकदा गांधी टोपी घालून लोकांना टोपी घालण्याचा उद्योग अण्णा हजारेंनी सुरु केला आहे. जनलोकपालचा मसुदा अण्णा हजारे यांनी केंद्र सरकारला सादर केला आहे. जनलोकपाल विधेयक हे भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी नेमावयाचे आहे. त्यासाठी लोकपालचे अध्यक्ष भारताचे सरन्यायाधीश किंवा माजी सरन्यायाधीश असतील. तसेच अध्यक्ष पदावरील व्यक्ती सर्वोच्च न्यायालयाची विद्यमान व माजी न्यायाधीश सुद्धा असू शकते. लोकपालाच्या अंतर्गत एक चौकशी शाखा असेल. डायरेक्टर ऑफ इन्क्वॉयरी हे त्याचे प्रमुख असतील. तर दिल्ली पोलीस इस्टॅब्लिसमेंट ॲक्ट १९४६ आणि सीव्हीसीच्या कलम ८ नुसार लोकपालाला अधिक्षक, निर्देश आणि तपासाचे पूर्ण अधिकार असतील. त्यासाठी अण्णा हजारे यांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु अण्णांची पार्श्वभूमी पाहता त्यांनी शासक असलेल्या ब्राह्मणांनाच मदत केली आहे. दर दहा वर्षांनी आपल्या देशामध्ये जनगणना होते. १८७१ ते १९३१ पर्यंत इंग्रजांनी जातीनिहाय जनगणना केली. परंतु त्यानंतर जातीनिहाय जनगणनेला ब्राह्मणांनी विरोध केला. फक्त आज एससी, एसटीची जातीनिहाय जनगणना होते. परंतु ओबीसींची जातीनिहाय जनगणना होत नाही. त्यामुळे ओबीसींसमोर आज हजारो समस्या निर्माण झाल्या आहेत. २०११ मध्येही ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा पुढे आला. कारण या देशात बहुजन समाजामध्ये झालेली जागृती आहे. ही जागृती करण्याचे काम अव्याहतपणे ४० वर्षे बामसेफच्या माध्यमातून सुरु आहे. म्हणून ओबीसी बांधवांमध्ये एक प्रकारची चेतना निर्माण होऊन जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा प्रकर्षाने चर्चीला गेला. या मुद्यावरुन लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी देशातील शासक असलेल्या ब्राह्मणांनी अण्णांना हाताशी धरुन जनलोकपालचा मुद्दा उपस्थित करायला लावला. अण्णा हजारेंनी त्यासाठी दिल्ली येथे आंदोलन केले. साऱ्या देशभरामध्ये 'मै हू अण्णा' अशा प्रकारची टोपी घालून बहुजनांना अण्णांनी 'टोपी' घातली. कारण ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेच्या मुद्यावर चर्चा होऊन निर्णय झाला असता तर निश्चितच त्याचा फायदा ओबीसींना झाला असता. परंतु ओबीसींना वंचित ठेवण्यासाठीच ही बदमाशी करण्यात आली.



जनलोकपालसाठी पुन्हा एकदा आंदोलन करण्याचा निर्णय घेणे म्हणजे ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेला फाटा देण्यासाठीच अण्णा हजारेंनी ही चाल खेळली आहे. या खेळीमागील खरा सूत्रधार अर्थातच शासक असलेला ब्राह्मण आहे. जनलोकपालला भ्रष्टाचार विरोधात चौकशी करण्याचे सर्वाधिकार देण्यात आले आहेत. तसा मसुदा अण्णांच्या चेलेचपाट्यांनी तयार केला आहे. समजा जनलोकपालने भ्रष्टाचार केल्यास त्याला कोण अडवणार? हा साधा सवालही अण्णांच्या मनात येत नाही. या देशातील संसद ही सार्वभौम आहे. संसदेमध्ये घेतले गेलेले निर्णय व केलेले कायदे हे सर्वांना बंधनकारक आहे. विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदेलाच सर्वाधिकार दिले आहेत. संसद जर सर्वसत्ताधिश असेल तर जनलोकपालच्या माध्यमातून दुसरे पर्यायी सत्तास्थान निर्माण करण्याची गरज का आहे? याचे उत्तर टोपीधारी अण्णांकडे आहे का? याचा अर्थ संविधानाविरोधात हा एक कलमी कार्यक्रम अण्णा हजारेंच्या मार्फत सुरु आहे. काही दिवस अण्णा गायब होतात आणि पुन्हा एकदा भूछत्राप्रमाणे उगवतात. भूछत्राचेही दोन प्रकार आहेत. एक विषारी व दुसरा बिनविषारी. बिनविषारी भूछत्र लोक खातात. परंतु अण्णा हजारे नामक जे भूछत्र आहे ते विषारी आहे. त्यामुळे बहुजनांनी या विषारी भूछत्रापासून सावध असायला हवे. त्याला साधा स्पर्शही करता कामा नये. नाही तर या विषारी भूछत्राने ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेच्या मुद्याची काय अवस्था केली. भूछत्राप्रमाणे हा मुद्दा कसा मातीत गाडला गेला हे सर्वांना ठाऊक आहे. काही दिवस उपोषण करतील आणि सरबताचे 'घोट' घेऊन ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेचा गळा 'घोट'तील. कारण जसा गांधींनी बहुजनांचा घोट घेतला तसाच त्यांची री ओढणाऱ्या अण्णासारख्या लोकांनाही घोट घेण्यात फार मोठा आनंद वाटतो. म्हणूनच अण्णांची ही नौटंकी समजून घेत बहुजन बांधवांनी त्यांना जाब विचारायला हवा. तसेच बहुजनांना जातीनिहाय जनगणनेसाठी देशात मोठे आंदोलन उभे करावे लागेल तरच यश निश्चितच आहे.

# काँग्रेस-भाजपा दोघेही डेटाचोर

## 'तू रडल्यासारखे कर, मी मारल्यासारखे' करतो अशीच त्यांची भूमिका

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

सोशल मीडिया (समाज माध्यमे) प्रभावी झाल्यापासून अनेकांनी याचा खुबीने वापर करुन घेतला आहे. मग तो कुठलाही कार्यक्रम असो अथवा निवडणुका असो सोशल मीडियातून झटकन लोकांपर्यंत पोहोचता येते. हे लक्षात घेऊन २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व भाजपाने याचा मोठ्या प्रमाणात वापर केला होता. तसेच काँग्रेसही सोशल मीडिया वापरण्यात मागे नाही. त्यामुळे हे दोन्ही पक्ष डेटाचोर आहेत. तू रडल्यासारखे कर मी मारल्यासारखे करतो अशीच त्यांची भूमिका असून लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा हा प्रकार आहे.

राहुल गांधी यांचे ट्विटर फॉलोअर्स वाढण्याला कॅम्ब्रीज ॲनालिटिका जबाबदार असल्याचा आरोप कायदा मंत्री रविशंकर प्रसाद यांनी केला आहे. आम्ही सोशल मीडियाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे निश्चित समर्थन करतो.

**लोकांच्या डोळ्यात धूळफेक**



परंतु फेसबुक व अन्य सोशल मीडियासारख्या कंपनीच्या माध्यमातून प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष स्वरुपातून भारताच्या निवडणूक प्रक्रियेला प्रभावित करण्याचा जो चुकीचा मार्ग अवलंबला आहे तो सहन केला जाणार नाही, असा इशारा दिला होता. दरम्यान काँग्रेसवर डेटा चोरीचा आरोप करणाऱ्या भाजपने २०१४ मध्ये लोकसभा व महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत कॅम्ब्रीज ॲनालिटिकाचा वापर केला होता. या पॉलिटिकल मार्केटिंगच्या केंद्रस्थानी नरेंद्र मोदी होते. त्याचे सर्व व्यवस्थापन राजू जैन यांनी केले होते. दरम्यान इकॉनॉमीक टाईम्सने २०१४ मध्ये निवडणूक कॅंपेनमध्ये जे भाजपचे लोक सामील होते त्यांच्याशी बातचीत केली आहे. त्यावेळी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने भारतीय शाखा ओवलेनो बिजनेस इंटेलिजेंस (ओबीआय) ची मदत घेतली होती. त्यावेळी न्यूयॉर्कस्थित एक भारतीय कंपनी सहयोगी होती. संशोधन, रणनिती आणि निवडणूक माहितीच्या संदर्भात या कंपनीचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे काँग्रेस काय आणि भाजप काय हे एकाच माळेचे मणी आहेत. परिणामी एकमेकांवर हे दोन्ही पक्ष डेटाचोरी प्रकरणी आरोप करत असले तरी त्यांचा गुप्त समझोता आहे.

त्यामुळे मूलनिवासी बहुजनांनी त्यांच्या या कुलंगड्यांपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# विश्व हिंदू परिषदेची सर्वोच्च न्यायालयाला धमकी!

## राम मंदीर विरोधात निर्णय मंजूर नाही

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

बाबरी मशीद जागेवरुन असलेला वाद सध्या सर्वोच्च न्यायालयात सुरु आहे. या प्रकरणी मुस्लीम पक्षकारांनी सर्वोच्च न्यायालय जो निर्णय देईल तो मान्य असल्याचे कबूल केले आहे. आता मात्र सर्वच मर्यादा ओलांडत विश्व हिंदू परिषदेने सर्वोच्च न्यायालयालाच धमकीवजा इशारा दिला आहे. विश्व हिंदू परिषदेचे म्हणणे आहे की जर सर्वोच्च न्यायालयाने राम मंदीर विरुद्ध निकाल दिला तर मान्य करणार नाही. म्हणजे विश्व हिंदू परिषदेला न्यायालयावर विश्वास नसल्याचे यातून दिसून येत आहे.



बुधवारला अयोध्येत महंत नृत्य गोपाल दास यांच्या घरी प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी सर्वोच्च न्यायालयाला प्रतिदिन सुनावणी करण्याची मागणी केली आहे. जेणेकरुन निकाल लवकरात लवकर येऊ शकेल.

दिनेशचंद्र म्हणाले की, जर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय राम मंदीराच्या बाजूने आला नाही तर ते पुन्हा एकदा रामाचे मंदीर बांधण्यासाठी लढा सुरु करतील. त्यांनी म्हटले आहे की, कोणत्याही परिस्थितीत अयोध्येत बाबरी मशीदचे निर्माण स्वीकार केले जाणार नाही. सोबतच गैरमुस्लीम समाज मशीदच्या बांधकामाला स्वीकार करणार नाही. त्यांनी आशा व्यक्त केली की सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय हा राम मंदीराच्या बाजूनेच येईल.

या सोबतच त्यांनी हे सुद्धा म्हटले की, जर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय मंदीराच्या विरोधात आला तर ज्या प्रकारे १५८२ पासून आम्ही लढत आलो आहोत, त्याच प्रकारे लढू.





# रेल्वे भारतीय संपत्ती की दलालांचे कुरण?

सागर रामभाऊ तायडे
मो.९९२०४०३८५९

भारतीय नागरिकांची सर्वात मोठी राष्ट्रीय व सार्वजनिक संपत्ती ही भारतीय रेल्वे आहे. ती देशातील करोडो नागरिकांना रोजगार देते. त्याचप्रमाणे करोडो प्रवाशांना जाण्या-येण्याची प्रवाशी सेवा देते. म्हणजेच देशातील सर्वात मोठी सोन्याचे अंडी देणारी कोंबडी आहे. पण सद्या ही कोंबडी कापून खाण्यासाठी लाखो दलाल राजकीय आशीर्वादाने कार्यरत आहेत. त्यांना रोखण्यासाठी सर्वात पुढे कामगार, कर्मचारी, अधिकारी यांच्या राष्ट्रीय ट्रेड युनियननी यायला पाहिजे होते.

परंतु त्या सर्व युनियन डोळे बंद करून बसलेल्या आहेत. कारण त्यांना देशातील बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय समाजाला कायमस्वरूपी न्याय हक्क आणि अधिकार मिळाला नाही पाहिजे, या विचाराच्या आहेत काय? त्यांना जातीव्यवस्था सारखी वागणूक मिळाली पाहिजे, हेच सर्व राष्ट्रीय ट्रेड युनियनचे मुख्य ध्येय, उद्दिष्ट आहे काय?

भारतातील रेल्वे स्टेशनवर प्रवाशांना पिण्यासाठी पाणी नाही. पण २० रुपये लिटर प्रमाणे बिस्लरी बाटल्या मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. पिण्याच्या पाण्यापेक्षा आवश्यक काय असेल ज्यात दहा-पंधरा टक्के कमिशन मिळेल ती सेवा देण्यास रेल्वे प्रशासन तयार आहे. भारतातील ४०० रेल्वे स्टेशनवर फ्री वायफाय सेवा देणार आहे. त्यासाठी सरकारने गूगलसोबत साडेचार लाख कोटी रुपयांचा करार केला आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करायला ७६ हजार कोटी नाहीत, मात्र वायफायसाठी साडेचार लाख कोटी आहेत.

माणसाला प्रवासात खायापियाला अन्न, पाणी पाहिजे कि वायफाय? रेल्वेने प्रवास करणारे प्रवासी किती वेळ स्टेशनवर थांबणार आहेत? तेव्हा त्यांना फ्री पिण्यास पाणी पाहिजे की फ्री वायफाय?

भारतीय रेल्वे जगात आदर्श मानली जात होती. देशाची शान होती. लोक रेल्वेने प्रवास करणे जास्त पसंद करीत होते. प्रत्येक मोठ्या जंक्शन स्टेशनवर प्रवाशांना सर्व सुविधा उपलब्ध असत, रेल्वे कामगार, कर्मचारी, अधिकारी जातीने लक्ष ठेऊन सुविधा पुरवीत होते. प्रवाशांचे सहर्ष स्वागत करणारा स्पीकर कानावर पडत असे. त्यामुळे प्रवाशांच्या मनाला समाधान वाटत होते आणि रेल्वे कर्मचारी, अधिकारी यांना आपण देशाच्या सर्वात मोठ्या क्षेत्रातील आहोत याचा गर्व वाटायचा. पण आज रेल्वेची हालत खूपच खराब आहे. भारतीय रेल्वे ही सर्वात मोठे दलालांचे कुरण झाले आहे. प्रवाशांना कोणत्या पद्धतीने लुटता येईल याचं हिशेबाने कर्मचारी, अधिकारी लक्ष देऊन असतात. कारण देशातील सर्वात मोठ्या क्षेत्रात आज खासगीकरण, ठेकेदारी कंत्राटी कामगार भरती झाले आहेत. त्यांचा एकच उद्देश पैसे कमविणे! कायमस्वरूपी लागणाऱ्या कामगार अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरल्या जात नाही. त्या कायमस्वरूपी बंद करण्याचा सपाटा रेल्वे मंत्रालयाने, रेल्वे बोर्डने लावला आहे. सरकारच भांडवलदारांच्या खर्चाने निवडून आले आहे. त्यात ब्राह्मणशाहीने पूर्णपणे प्रशासनावर कब्जा करून ठेवला आहे. त्याला रोखण्यास राष्ट्रीय ट्रेड युनियन असमर्थ ठरत आहेत. कारण ट्रेड युनियनचे नेतृत्व आणि विचारधारा ही वर्णव्यवस्थेचे समर्थन करणारी आहे. संघटीत कामगारांच्या त्या ट्रेड युनियनच्या दोगल्या नीतीमुळे आज सर्वात मोठ्या क्षेत्रातील संघटीत कामगार कर्मचारी आणि अधिकारी उद्ध्वस्त होत आहेत. त्यामुळेच रेल्वेत असंघटीत कामगारांची कंत्राटी कामगार संख्या वेगाने वाढत चालली आहे.

संघटित कामगारांच्या राष्ट्रीय ट्रेड युनियन कामगारांना न्याय मिळवून देण्यास असमर्थ का ठरत आहेत? आजच्या स्थितीत अकरा लाख कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता, घरभाडे दीड दोन वर्षांपासून दिले नाही. सरासरी एका कामगाराचा दीड लाख रुपये पकडला तर अकरा लाख कर्मचाऱ्यांचे किती रुपये होईल? विचार करा(१५0000 X ११00000 = १६५,00000000हा एरीयस कुठे गेला? याबाबत अधिकृत ट्रेड युनियनने कोणतीही निर्णायक भूमिका किंवा आंदोलन केलेले नाही. संघटीत कामगार, कर्मचारी अधिकारी वर्गाचे याबाबत काय मत आहे हे जाणून घेण्यासाठी मतदान घेतले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १२/१३ फेब्रुवारी १९३८ ला मनमाडला रेल्वे गँगमन कामगार परिषदमध्ये सांगितले होते. स्वतःच्या रक्षणासाठी मागासवर्गीय कामगार कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या विचारांच्या ट्रेड युनियन बनवा आणि सरकार व प्रशासनावर कायमस्वरूपी दबाव निर्माण करा. कोणताही निर्णय घेतांना त्यांना तुम्ही समोर दिसले पाहिजे. तुमची संख्या लक्षवेधी आहे. परंतु देशातील मागासवर्गीय कामगारांनी बाबासाहेबांचे ऐकले नाही. त्याचा परिणाम आज देशातील सर्व क्षेत्रातील सर्वच कामगार, कर्मचारी भोगतात. कामगार विरोधी ब्राम्हणवादी भांडवलशाहीवादी राष्ट्रीय ट्रेड युनियनच्या हातात हात घालुन बहुसंख्य मागासवर्गीय समाजाच्या कामगार कर्मचाऱ्यांवर राज्य करीत आहेत. संघटीत कामगारांची ही हालत असेल तर असंघटीत कामगारांचे काय?

देशात आजच्याघडीला ९३ टक्के असंघटीत कामगार आहेत, ते सर्व बहुजन मागासवर्गीय, अल्पसंख्याक, आदिवासी समाजाचे असून मोठ्या संख्येने कंत्राटदाराकडे कंत्राटी कामगार म्हणून कायमस्वरूपी काम करतात. वास्तविक पाहता २४0 दिवस सेवेत काम केल्यानंतर कायम करण्याचा कामगार - कर्मचाऱ्यांना कायदेशीर अधिकार केंद्रीय कामगार कायद्याने औद्योगिक विवाद कायदा १९४७ कलम २५ ब (Industrial Disputes act 1947 clause 25 B) दिलेला आहे. याच कायद्याआधारे देशभरात विविध क्षेत्रात लाखो कर्मचारी कायम झाले आहेत. खाजगी कंपन्या त्याची अंमलबजावणी करीत नसतील, पण सार्वजनिक क्षेत्रातील राज्य व केंद्रातील उपक्रमात या कायद्याने १00 टक्के अंमलबजावणी केली आहे. केंद्रातील सरकारने हजारो कामगार कायदे मोडीत काढले असताना १३ राष्ट्रीय ट्रेड युनियनने या विरोधात ठोस निर्णय घेऊन तीव्र आंदोलन केले नाही. केवळ कामगारांचे समाधान व्हावे यासाठी आंदोलने झाली आहेत. त्यात तडजोड होऊन राजकीय पक्ष त्यांच्या नेतृत्वाखालील युनियन यांच्या नातलगांना किंवा कार्यकर्त्यांना कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम दिल्या गेले आहे. त्यासाठी हा कायदा काय मोडीत काढला आहे का?

कंत्राटी पध्दतीने निर्माण केलेली पदे कायमस्वरूपी समजण्यात येऊ नयेत, या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयची अंमलबजावणी करण्याच्या तयारीत सरकार लागले आहे. सर्वोच्च न्यायालय, राज्य सरकार व केंद्र सरकार कंत्राटी कामगारांच्या विरोधात असून चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल ते जून या तिमाहीमध्ये कारखानदार क्षेत्रातील ८७ हजार कामगारांच्या नोकऱ्यांत कपात झाली आहे. तसेच रेल्वे मध्ये ९0 हजार कंत्राटी कामगार आहेत. अशा अनेक क्षेत्रातील कंत्राटी कामगारांच्या विरोधात न्यायपालिका, केंद्र व राज्य सरकार ठोस भूमिका घेत असताना सर्व राष्ट्रीय ट्रेड युनियन कामगारांच्या रक्षणासाठी एकत्र न येता आपल्या वैचारिक वारसदारांचे स्वरक्षण करण्यासाठी गप्प बसलेल्या आहेत. म्हणूनच तमाम कामगार, कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी भारतीय रेल्वे वाचवण्यासाठी ब्राम्हणशाही भांडवलशाहीचे समर्थन करणाऱ्या ट्रेड युनियनच्या विरोधात एकत्र येऊन तिचे रक्षणासाठी दलालांचे कुरण मोडून काढावे लागेल. तेव्हाच रेल्वे भारतीय संपत्ती असल्याचा आपल्या सर्वांना गर्व असेल.

# चौंकशी केल्यानंतर लागणार अॅट्रॉसिटी!

## सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

अनु.जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत यापुढे कोणत्याही आरोपीस तत्काळ अटक करता येणार नाही. आरोपाची चौकशी केल्यानंतरच आरोपींना अटक करता येईल असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. तक्रारींची सत्यता जाणून घेतल्याशिवाय यापुढे कुणावरही गुन्हा नोंदविता येणार नाही. प्राथमिक चौकशीनंतर गुन्हा नोंदविला तरी सक्षम अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय आरोपीस अटकही करता येणार नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारला दिला.



अॅट्रॉसिटी कायद्यात आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर करण्यास पूर्ण प्रतिबंध नाही. केलेली तक्रार सत्य नाही ती कुहेतूने केल्याचे प्रथमदृष्ट्या वाटत असेल तर न्यायालय आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर करु शकते असेही सर्वोच्च न्यायालय म्हणाले.

निरपराध लोकांना यात गोवण्याचे प्रकार टाळण्यासाठी अॅट्रॉसिटीच्या तक्रारीची सत्यता जाणून घेण्यासाठी पोलीस अधिक्षकांनी प्राथमिक चौकशी ही ७ दिवसात पूर्ण करावी.

अॅट्रॉसिटीचे प्रकरण आहे असे वाटल्यास आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवावा.

या कायद्याचा दुरुपयोगाच्या घटना वाढत आहेत. गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा होण्याचे प्रमाण फारच कमी आहे. ही बाब नोंद करत न्यायालयाने बजावले की, हा कायदा अनु.जाती, जमातीच्या हक्क संरक्षणासाठी असला तरी याचा वापर अन्य वर्गाविरुद्ध करता येऊ शकत नाही. अॅट्रॉसिटीची तक्रार केली म्हणून न्याय प्रक्रियेचा अवलंब न करता कुणाचेही स्वातंत्र्य हिरावून घेणे हे घटनेतील मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे.

या कायद्यातील अटकेच्या अधिकाराचा दुरुपयोग होतो हे लक्षात घेता, गुन्हा नोंद करताच आरोपीस अटक करता येणार नाही. आरोपी सरकारी कर्मचारी असल्यास त्याच्या अधिकाऱ्याच्या परवानगीने आरोपीस अटक करता येईल. इतर प्रकरणात पोलीस अधिक्षकांच्या लेखी परवानगीने आरोपीस अटक करता येईल.



# साडे आठ लाख मजुरांकडे सरकारने फिरविली पाठ

## मजुरांसाठी असलेले २८ हजार कोटी अखर्चित

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या असंघटित क्षेत्रातील लाखो कामगारांना सामाजिक न्याय तसेच आर्थिक न्याय मिळाला नाही. त्यांच्यासाठी बनलेल्या दोन मुख्य कायद्याचे कोणतेही राज्य सरकार पालन करु इच्छित नाही. सेस कायद्याच्या माध्यमातून बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणाच्या नावावर ३७,४०० कोटी रुपये जमा केले गेले. परंतु यातील केवळ ९५०० कोटी रुपयेच खर्च केल्या गेले आहेत. बाकी २८ हजार कोटी रुपयांचे काय झाले? काय देशातील कामगार या निधीचा लाभ घेऊ शकले नाहीत? या प्रश्नाचे उत्तर शोधणे गरजेचे आहे.



सर्वोच्च न्यायालयाने कठोर शब्दात कामगारांची स्थिती वर्णन करत एका याचिकेवर केंद्र व राज्य सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश जारी केले आहेत. न्या.मदन बी लोकूर आणि न्या.दीपक गुप्ता यांनी दिलेल्या निर्णयात सरकारला वेळ ठरवून मजूर व त्यांच्याकडून काम घेणाऱ्या संस्थांची नोंदणी तसेच लाभदायक योजना त्यांच्यापर्यंत पोहविण्यासाठी म्हटले आहे.

ही याचिका नॅयशनल कँपेन फॉस सेंट्रल लेजिस्लेशन ऑन कंस्ट्रक्शन लेबरकडून दाखल केली होती. या कमेटीचे म्हणणे आहे की सर्वच सरकारे असंघटीत क्षेत्रातील कामगारांकडे दुर्लक्ष करते.

सेस अधिनियमांतर्गत सर्वच प्रकरचे बांधकाम करणाऱ्या संस्थेकडून सरकारला महसूल घेण्याचा अधिकार आहे. ज्याचा उपयोग मजुरांच्या कल्याणासाठी बनलेल्या मंडळाला निधी उपलब्ध करण्यास होईल. या कायद्याच्या अंतर्गत मजुरांची सुरक्षा आणि कल्याणाची जबाबदारी सरकारची आहे. याला लागू न करणे म्हणजे मजुरांचे सन्मानाने जीवन जगण्याचा संविधानिक अधिकाराचे उल्लंघन आहे.


### ईव्हीएमवरील लक्ष विचलित करण्यासाठीच

# काँग्रेस-भाजपाची नौटंकी

## ईव्हीएममध्ये फेरफार होण्याची शक्यता, सुरात सुर मिसळला

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

संपूर्ण देशभरात ईव्हीएम विरोधात भारत मुक्ती मोर्चाद्वारे विरोध प्रदर्शन केले जात असताना ईव्हीएम विवादावरुन लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी काँग्रेस पक्षाने सुद्धा आगामी निवडणुका मतपत्रत्रिकेवर व्हाव्यात असा सूर आवळला आहे. तर दुसरीकडे भाजपचे महासचिव राम माधव यांनीही काँग्रेसचे समर्थन करत मतपत्रिकेवर निवडणुका होण्याचे कबूल केले आहे. काँग्रेस आणि भाजपाला मतपत्रिका नको असून ईव्हीएम हवी आहे. केवळ लोकांचा विरोध क्षमविण्यासाठी नोटंकी केली जात आहे. सन २०१९ च्या निवडणुका सुद्धा ईव्हीएमवर घेऊन ईव्हीएममध्ये फेरफार होण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही.



भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी दावा केला आहे की, भाजपला सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत २०१४ च्या तुलनेत अधिक जागा मिळतील. पुढे अमित शहा म्हणाले की, नरेंद्र मोदीच्या नेतृत्वात सन २०२४ पर्यंत मजबूर सरकार राहील. त्यांनी ही बाब झी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत म्हटली.

अमित शहा यांना पत्रकाराने प्रश्न विचारला की काय २०१४ प्रमाणे २०१८ मध्येही मोदी लहर कायम आहे. यावर उत्तर देत अमित शहा म्हणाले की, २०१९ मध्ये २०१४ पेक्षा अधिक जागा जिंकून नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात २०२४ पर्यंत मजबूत सरकार बनेल. सरकारच्या शेवटच्या संधीवर बोलताना अमित शहा म्हणाले की ही शेवटची संधी नाही व २०१९ ची सुद्धा शेवटची संधी नाही.

विशेष बाब म्हणजे आजपर्यंत लोकसभा पोटनिवडणुकीत भाजप उमेवदाराचा पराभव झालेला आहे अशी स्थिती असताना अमित शहा कुठल्या बाबीवर म्हणत आहेत की २०१९ व २०२४ मध्ये भाजपला २०१४ च्या तुलनेत अधिक जागा मिळतील. त्यांच्या य वक्तव्यातूनच सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ईव्हीएममध्ये फेरफार होण्याची शक्यता दिसून येत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

### ठाकरेंचे 'राज'कारण संपले

# मोदीमुक्त भारताचे 'राज' काय?

## राजकीय तज्ञांचा सवाल



**मुंबई । मूलनिवासी प्रतिनिधी**

एकेकाळी मोदींची तोंडफाटेपर्यंत स्तुती करणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यु टर्न घेत भारताला मोदीमुक्त करण्याचे आवाहन केले आहे. या मोदीमुक्त भारताचे नेमके राज काय? असा सवाल राजकीय तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. एकंदरीत ठाकरेंचे 'राज'कारण संपल्यात जमा आहे. यावरुनच अशातऱ्हेची विधाने त्यांच्याकडून सातत्याने येऊ लागली आहेत.

राज ठाकरे यांनी रविवारी शिवाजी पार्कच्या मेळाव्यात हे आवाहन केले. देशातील सर्व राजकीय पक्षांनी मतभेद विसरुन मोदीमुक्त भारताचे स्वप्न साकार करायला हवे. हे केवळ महाराष्ट्राच्या हिताचे नव्हे तर देशाच्या हिताचे आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मोदींवर विश्वास ठेवून लोकांनी मते दिली. परंतु त्यानंतर लोकांचा विश्वासघात झाला आहे. परदेशातून आलेले प्रधानमंत्री आणि राष्ट्राध्यक्षांना घेऊन मोदी केवळ गुजरातमध्ये जातात. मोदी आपल्या गृहराज्याच्या विकासासाठीच अशा प्रकारचे कार्यक्रम आखतात, असा आरोप राज ठाकरे यांनी केला. विदेशातील राष्ट्राध्यक्षांना कोलकाता, चेन्नई, मुंबई या ठिकाणी का आणले जात नाही? तर निरव मोदीने ११ हजार ४०० कोटींचा घोटाळा करुन तो परदेशात पळून गेला आहे. त्याला पासपोर्टसाठी कुणी मदत केली? कुठल्या एअरपोर्टवरुन तो पळाला? यामागे निश्चितच मोदी सरकारचेच षड्यंत्र असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला.

### भाजपकडून हिंदू-मुस्लिमांमध्ये दंगल घडविण्याची शक्यता

आगामी लोकसभा निवडणुका जिंकण्यासाठी भारतीय जनता पार्टीकडून राम मंदीराच्या नावावर हिंदू-मुस्लिमांमध्ये दंगा घडविला जाईल, असा आरोप ठाकरे यांनी केला. अशा प्रकारे दंगा घडविण्यासाठी व्युव्हरचना आखली जात आहे. त्यामुळे भाजपापासून सावध असावे, असे आवाहन ठाकरे यांनी केले.

# भाजप नेत्यासह सर्वच गोरक्षकांना आजीवन कारावास

## अलीमुद्दिन हत्याकांड खटला

**रामगढ । मूलनिवासी वृत्तसंस्था**

झारखंड राज्यात रामगढ जिल्ह्यात गोमास ठेवल्याच्या संशयावरुन अलीमुद्दिन नावाच्या मुस्लीम व्यक्तीला बेदम मारहाण करण्यात आली होती, ज्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणात रामगढच्या जलदगती न्यायालयाने भाजप नेत्यासह ११ गोरक्षक दलाच्या कार्यकर्त्यांना दोषी ठरवून त्यांना आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

भारतीय दंड विधान धारा १४७, १४८, १४९, ४२१, ३०२ व १०२ अंतर्गत सर्वच आरोपींना दोषी ठरविले आहे. न्यायालयाने गत १६ मार्च रोजी दीपक मिश्रा, छोटू वर्मा व संतोष सिंह यांना मुख्य आरोपी असल्याचे म्हटले आहे. सोबतच भाजप नेते नित्यानंद महतो, विक्की साव, सिकंदर राम, कपिल ठाकूर, रोहित ठाकूर, राजू कुमार, विक्रम प्रसाद व उत्तम राव यांनाही दोषी ठरविले होते.

माहीत असावे की, अलीमुद्दिन यांना ब्राह्मणवादी संघटनाच्या कार्यकर्त्यांनी जून २०१७ मध्ये वाहनात गोमास घेऊन जात अल्याच्या संशयावरुन बेदम मारहाण केली होती. ज्यामध्ये त्याचा मृत्यू झाला होता. या सोबतच त्याच्या वाहनाची जाळपोळ केली होती.



अलीमुद्दिन यांची पत्नी खातून हिने या प्रकरणात प्राथमिक गुन्हा नोंद केला होता. बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांवर कट रचून हत्या करण्याचा आरोप लावला होता. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची प्रतिदिन सुनावणी करण्यासाठी आर.बी.पाल यांच्या न्यायालयात जलदगती न्यायालयाची स्थापना केली होती. उच्च न्यायालयाच्या देखरेखीत या प्रकरणाची सुनावणी झाली.

सुनावणी दरम्यान फिर्यादीकडून १९ साक्षीदार सादर केले. तसेच ५९ दस्तावेज व २० वस्तूही न्यायालयात सादर करण्यात आल्या. रामगढ मुख्याधिकाऱ्यांकडून तयार केलेल्या सीडीचा तपास केंद्रीय प्रयोगशाळा चंदीगढ येथे करुन साक्ष म्हणून न्यायालयात सादर करण्यात आली.

Postal Reg. No. NP City/391/2017-2019
संघर्षासाठी मूलनिवासी भारत
बामसेफ कार्यालय : भुरे कॉम्प्लेक्स,
दुसरा माळा, वैद्यनाथ चौक, नागपूर - ०९
फोन नं. ०७१२-२७५४३२६, मो. ०७७५६०२१४१८

प्रति,

संघर्षासाठी मूलनिवासी भारत
RNI No. MAHMAR/3683,
रविवार, दिनांक २५ मार्च, २०१८
Day of posting every Wednesday.
Posted at Nagpur, PSO

# हे कायद्याचे? छे! हे ब्राह्मणांचे राज्य

## अॅट्रॉसिटीत बदल म्हणजे आरएसएसचे पडद्यामागील राजकारण

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

अनु.जाती व अनु.जमातींवरील अत्याचार प्रतिबंधक कायद्याखालील (अॅट्रॉसिटी कायदा) तक्रारीची शहानिशा केल्याशिवाय गुन्हा दाखल करु नये आणि या कायद्याखाली अटक करणे बंधनकारक नाही, असा सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत एका नवीन वादाला तोंड फोडले आहे. सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल दिला असला तरी अॅट्रासिटीत बदल व्हावा हे आरएसएसचे पडद्यामागील राजकारण आहे. त्यामुळे हे कायद्याचे राज्य नसून ब्राह्मणांचे राज्य आहे. अशा प्रकारचा संदेशच या निर्णयातून दिला गेला आहे.

विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ ला भारताला संविधान दिले. त्यानंतर २६ जानेवारी १९५० ला संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. संविधानातील कलम कलम १७ नुसार ११ सप्टेंबर १९८९ मध्ये हा कायदा केंद्र सरकारने बनविला व ३० जानेवारी १९९० ला हा कायदा लागू केला. कारण त्यावेळी अनु.जाती, जमातींवर अनेकदा मोठ्या प्रमाणात हल्ले झाले. त्यांच्या संरक्षणासाठी हा कायद बनविला गेला. कायदा बनविणे हे संसदेचे काम आहे.



त्याची अंमलबजावणी करणे हे न्यायालयाचे काम आहे. संसद ही सार्वभौम असताना कायदा बनविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने अॅट्रॉसिटी संदर्भात जी काय ढवळढवळ केली आहे ती संविधानाच्या विरोधात आहे.

दरम्यान गतवर्षी उभ्या महाराष्ट्रात मराठा क्रांती मूकमोर्चे काढण्यात आले. त्यावेळीही अॅट्रॉसिटी रद्द करावा अशी प्रमुख मागणी होती. परंतु यामागणीमागील खरा सूत्रधार अर्थात आरएसएस होता. म्हणजे ब्राम्हण होते, हे आता लपून राहिलेले नाही. अॅट्रोसिटी कमकुवत केल्याने ब्राम्हणांना अत्याचार करणे आणखी सोपे होईल असे यामागील खरे इंगित आहे. दरम्यान राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील एससी व आदिवासी खासदारांनी सामाजिक न्यायमंत्री थावरचंद गेहलोत यांची भेट घेऊन केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात पुर्नर्विचार याचिका करावी अशी मागणी केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीच यासाठी पुढाकार घ्यायला हवा असे या सर्वांचे म्हणणे आहे. ही मागणी आम्ही प्रधानमंत्र्यांच्या लक्षात आणून देऊ असे गेहलोत यांनी सांगत या प्रकरणातून अंग काढून घेतले.

एखादे प्रकरण खरे असतानाही पोलीस अधिक्षकाने गुन्हा दाखल करण्यास परवानगी दिली नाही किंवा सरकारी अधिकाऱ्याने आपल्या कर्मचाऱ्याला अटक करण्याची संमती दिली नाही तर हा कायदाच निरर्थक ठरेल, अशी भीती या खासदारांनी व्यक्त केली. या कायद्याखाली दाखल झालेली सर्वच प्रकरणे खोटी नसतात. त्यामुळे त्याचा सरसकट गैरवापर होतो असे म्हणणे चुकीचे आहे. तसेच सर्वच कायद्यांचा काही ना काही प्रमाणात गैरवापर होतच असतो. त्यामुळे कायद्यातील तरतुदींना धक्का लावणे अयोग्य आहे, सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे कायद्याला अर्थच राहणार नाही असे या खासदारांचे मत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे अॅट्रॉसिटीचा कायदाच बोथट झाला आहे. तर एससी, एसटीवर अन्याय करणाऱ्यांना अभय मिळणार आहे. कायद्याला वेसण घालणासारख्या गोष्टी न्यायसंस्थेने करू नये.

### अॅट्रॉसिटीने एकबोटेची ‘बोटे’ छाटल्याने आरएसएस धास्तावला

मराठा क्रांती मूक मोर्चाने उभा महाराष्ट्र ढवळून निघाला. या मोर्चामध्ये अॅट्रॉसिटीत बदल करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली होती. लाखोंचे मोर्चे काढूनही व अॅट्रॉसिटीची प्रमुख मागणी असूनही याची साधी दखलही राज्य सरकार, केंद्र सरकार, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने घेतली नाही. परंतु अॅट्रॉसिटीचा फटका ब्राह्मणांना बसताच सर्वोच्च न्यायालय आरएसएसच्या सांगण्यावरुन खडबडून जागे झाले. १ जानेवारी २०१८ मध्ये भीमा-कोरेगाव येथे जातीय दंगल करण्यास कारणीभूत ठरल्याप्रकरणी आरएसएसचा चेला मिलिंद एकबोटे याच्या विरोधात शिक्रापूर पोलीस ठाण्यात अॅट्रॉसिटी दाखल झाली. त्यामुळे पोलिसांनी त्याला अटक केली. त्याचबरोबर या प्रकरणाचा दुसरा मास्टर माईंड संभाजी भिडे याच्या विरोधातही अॅट्रॉसिटी दाखल करावी, अशी मागणी आहे. अॅट्रॉसिटीने एकबोटेची ‘बोटे’ छाटल्याने आरएसएस कमालीचा धास्तावला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात बसलेल्या ब्राह्मण न्यायाधीशांवर अप्रत्यक्षरित्या आरएसएसने दबाव टाकून अॅट्रॉसिटीत बदल करायला लावला, अशी चर्चा सुरु झाली आहे.

# मुजफ्फरनगर दंगलीतील आरोपींवरील खटले घेणार वापस

## मुख्यमंत्री आदित्यनाथ यांचा आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

योगी आदित्यनाथ सरकारने मुजफ्फरनगर दंगलीतील आरोपींवर असलेले गंभीर स्वरुपाचे १३१ खटले वापस घेण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ या दंगलीतील आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न करत असल्याची सडकून टीका त्यांच्यावर केली जात आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मुजफ्फरनगर येथे झालेल्या दंगलीतील जे १३१ खटले वापस घेण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यात हत्येचे १३, हत्येचा प्रयत्न करण्याचे ११ खटले आहेत. सन २०१३ मध्ये मुजफ्फरनगर, शामलीमध्ये झालेल्या दंगलीत ५०० हून अधिक खटले दाखल झाले होते. खटल्यातील दस्तावेज पाहिल्यानंतर इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्राला असे दिसून आले की, सर्वच खटले गंभीर स्वरुपाचे आहेत. ज्यामध्ये किमान सात वर्षांची शिक्षा होऊ शकते. १६ खटले सेक्शन १५३ ए म्हणजे धार्मिक आधारावर घृणा पसरविण्याचे आरोप आहेत. तसेच दोन खटले सेक्शन २९५ चे नोंद आहेत. म्हणजे धार्मिक भावना दुखावण्यासाठी चिथावणीखोर भाषण देण्याचा आरोप आहे.

मुजफ्फरनगर येथे झालेल्या दंगलीत ६२ लोकांचा मृत्यू झाला होता तर १ हजार लोकांना आपले घरदार सोडावे लागले होते. ही दंगल २०१३ मध्ये झाली होती. दंगलीनंतर १४५५ लोकांच्या विरुद्ध ५०३ खटले नोंद झाले होते. भाजपचे खासदार संजीव बलियान व आमदार उमेश मलिक यांच्या नेतृत्वात



खाप पंचायतीच्या प्रतिनिधी मंडळाने ५ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री आदित्यनाथ यांची भेट घेऊन त्यांना १७९ खटल्यांची यादी सोपवून खटले मागे घेण्याची मागणी केली होती. ज्यानंतर सरकारने खटले वापस घेण्याची प्रक्रिया सुरु केली.

इंडियन एक्सप्रेसशी बोलताना संजीव बलीयान म्हणाले, त्यांनी मुख्यमंत्र्यांना जी यीदी सोपविली होती त्यात सर्व गैरमुस्लीम होते.

याविषयी जेव्हा राज्याचे मुख्य गृहसचिव अरविंद कुमार यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी माझ्याकडे माहिती नसल्याचे सांगितले. राज्यात कायदा विभाग अशी प्रकरणे पाहत आहे. कायदा विभागाच्या विशेष सचिवांनीही यावर टिपण्णी करण्यास नकार दिली. मात्र यापूर्वी खटले वापस घेण्यासाठी शासनाकडून पत्र जाण्याचे स्पष्ट केले आहे. संजीव बलीयान यांनी इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, ८५० आरोपींवर असलेले १७९ खटले वापस घेण्यासाठी मी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेतली होती. भेटी दरम्यान त्यांनी कानून विभागाकडून कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. ५ जानेवारी रोजी शासनाने आमदार मलिक यांच्यावरील ९ खटले वापस घेण्याच्या प्रकरणात मुजफ्फरनगर प्रशासनाकडून अहवाल मागितला होता.

**संघर्षासाठी मूलनिवासी भारत** या अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखकांच्या लेखामधील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**संघर्षासाठी मूलनिवासी भारत** हे साप्ताहिक मुद्रक, मालक, प्रकाशक आणि संपादक वामन चिंधूजी मेश्राम यांनी छत्रपती प्रिंटर्स, सर्व्हे नं. ०५, ४/३११, केशवनगर, मुंढवा, पुणे - ४११०३६ येथे छापून बामसेफ कार्यालय, ३० भुरे कॉम्प्लेक्स, वैद्यनाथ चौक, नागपूर - ४४०००९ येथे प्रकाशित केले